01355 PUNE UNIVERSITY CAMPUS
PUNE UNIVERSITY MAIN BLDG
GANESHKHIND RD PUNE
UNIVERSITY CTR 411007
IFSCode : MAHB0001355

A/c Payee

Valid for 3 Months from the date of Issue

| 2 | 3 | 0 | 3 | 2 | 0 | 2 | 3 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| D | D | M | M | Y | Y | Y | Y |

Pay अदा करें PRIN. PESS MODERN LAW COLLEGE GANESHKHIND Or Bearer

Rupees रुपये Fifty Six Thousand Four Hundred Thirty Eight Only या धारक को

₹ **56,438.00

A/c No. खाता क्र. 60027944055

FINANCE AND ACCOUNTS OFFICER S P PUNE UN IVERSITY

Payable at par at all the branches of Bank of Maharashtra.

Authorised Signatory(ies)

हस्ताक्षर/ Signature(s)
Please sign above

⑈571362⑈ 411014058⑆ 000099⑈ 11

QIP Seminar National Education Policy
2022-2023

SESHAASAI (M) / CTS 2010

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेलः pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ क्र.: साफुपुवि/निववि/४७०

दिनांक : ०३/०१/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी' या विषयावर राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी अर्थसहाय्य मंजूरीबाबत...

संदर्भ : १) या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/२४६, दिनांक : २९/०७/२०२२
२) या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/२७५, दिनांक : २३/०८/२०२२

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी' या विषयावरील राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर केलेल्या प्रस्तावांपैकी गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शकतत्वांस अनुसरून छाननीअंती पात्र ठरलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालयांना व परिसंस्थांना मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय कार्यशाळेच्या आयोजनासाठी कमाल रु. ५०,०००/—(रु. पन्नास हजार फक्त) व राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेच्या आयोजनासाठी कमाल रु. १,००,०००/—(रु. एक लाख फक्त) इतके अर्थसहाय्य मंजूर करण्यांत येत आहे.

आपणांस विनंती की, सदर कार्यशाळांचे आयोजन दिनांक १५ फेब्रुवारी **२०२३ पूर्वी** करण्यात यावे. कार्यशाळांचे आयोजन झाल्यावर ७२ तासांच्या आत सहभागी व्यक्तींची माहिती विद्यापीठाच्या **unipune.ac.in – Home page - BOD Online – Login - For College Users - College Login & Password – Planning and Development -Submit-participants details** या लिंकवर सादर करावी. तसेच कार्यशाळेचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये भरुन विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे.

महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केलेल्या नियम व अटींच्या अधिन राहून राज्य, राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळांचे आयोजन करून त्यांची देयके महाविद्यालये/परिसंस्थेच्या अंतर्गत हिशेब तपासनीसांकडून तपासणी (Audit) करून घेवून लेखापरीक्षणासाठी सादर करण्याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. सदर देयकांसोबत महाविद्यालय/परिसंस्थेने प्राचार्य/संचालक यांची विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत, नॅक/एन.बी.ए मूल्यांकन प्रमाणपत्राची प्रत, शैक्षणिक वर्ष २०२२—२३ करिता भरलेल्या संलग्नीकरण शुल्काची पावती, प्रोरेटा, एआयएसएचई व एमआयएस माहिती भरल्याच्या प्रमाणपत्राची प्रत इत्यादी कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळांच्या आयोजनासाठी महाविद्यालये/परिसंस्थांना विद्यापीठांकडून अर्थसहाय्याची प्रतिपूर्ती मार्च २०२३ मध्ये होणाऱ्या लेखा परीक्षण शिबीरानंतर करण्यात येणार आहे. सदर प्रतिपूर्ती लवकर होण्याच्या दृष्टीने कार्यशाळेच्या आयोजनानंतर सर्व बाबींची पूर्तता करुन कार्यशाळेच्या हिशेबाची कागदपत्रे विद्यापीठाने निर्देशित केलेल्या दिनांकास लेखा परीक्षण शिबीरामध्ये विद्यापीठाकडे सादर करावीत.

राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालयांची यादी (परिशिष्ट १ व २) आणि कार्यशाळेचे आयोजन व हिशेब सादर करताना महाविद्यालये/परिसंस्थेने घ्यावयाच्या काळजी या बाबतची माहिती सोबत जोडलेली आहे.

डॉ. वैशाली सांकोरे
उपकुलसचिव

सोबत : १) कार्यशाळांचे आयोजन व हिशेब सादर करताना घ्यावयाची काळजी
२) अहवाल सादर करण्याचा नमुना
३) राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेसाठी मंजुर महाविद्यालयांची यादी परिशिष्ट – १ पान क्र. १ ते २०
४) राज्य पातळीवरील कार्यशाळेसाठी मंजुर महाविद्यालयांची यादी परिशिष्ट – २ पान क्र. १ ते १४